Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 6 No. : 3 Issue - 18 Dec.2018 ISSN No. :2347-9639

UGC Approved Journal
ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
No.64299


36 Years

# VICHAR MANTHAN

IIJIF
Impact Factor
2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Maharashtratil Sthityantare



# विचार मंथन

## महाराष्ट्रातील स्थित्यंतरे

मुख्य संपादक – प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक – डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

अथर्व
पब्लिकेशन्स्

Scanned with CamScanner

**36 Year's**

**Maharashtra Political Science & Public Administration Conference**

# VICHAR MANTHAN

**National Research Journal of Political Science and Public Administration**

**(A Peer Reviewed Journal)**

Vol. - 6 , No - 3 Issue - 18 December. 2018 ISSN- 2347-9639

**♦ Chief Editor / President ♦**

**Prin. Dr. P. D. Deore**

11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

**♦ Editor ♦**

**Prin. Dr. Pramod Pawar**

Dhandai College, Amalner Dist. Jalgaon

Email- pramodpawar1761@gmail.com Mob:9423582073

**♦ Editor / Secretary ♦**

**Prin. Dr. Manohar Patil**

S.S.V.P.S College, Dhule

Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

**♦ Advisory Editors ♦**

**Dr. Vitthal More** (Latur)
**Dr. Mohan Kashikar** (Nagpur)
**Dr. Bharati Patil** (Kolhapur)
**Dr. Prakash Pawar** (Kolhapur)
**Dr. Rajeshwari Deshpande** (Pune)
**Dr. Liaqat Khan** (Mumbai)
**Dr. Ashok Naikwade** (Aurangabad)
**Prof. Urmila Chavhan** (Meeraj)
**Dr. Manik Sonawane** (Pune)
**Dr. Sanjay Gore** (Gadchiroli)
**Dr. Pyarelal Suryawanshi** (Amravati)
**Dr. Pramod Shambharkar** (Chandrapur)
**Mr. Vitthal Dahiphade** (Nanded)
**Dr. Vakil T. Shaikh** (Koradi-Nagpur)
**Dr. Sanjay Wagh** (Mumbai)
**Dr. Suresh Bhalerao** (Parbhani)
**Dr. Sachin Patil** (Sangali)
**Dr. Kusum More** (Latur)
**Dr. Alka Deshmukh** (Nagpur)
**Dr. Vasanti Rasam** (Kolhapur)
**Dr. Balasaheb Bhosale** (Tasgaon)
**Dr. Bal Kamble** (Karjat-Pune)
**Dr. Chaitra Redkar** (Mumbai)
**Dr. Prashant Amrutkar** (Aurangabad)
**Dr. Sunil Shinde** (Parbhani)
**Dr. Jyotsna Sonkhaskar** (Nashik)
**Dr. Nandaji Satpute** (Gadchiroli)
**Dr. Vinod Gaikwad** (Shegaon)
**Dr. Sandeep Kale** (Selu-Vardha)
**Dr. Meera Phad** (Nanded)
**Mr. Dattatray Wabale** (Pune)
**Mr. Mahesh Birhade** (Raigad)
**Dr. Hanumant Phatak** (Baramati-Pune)
**Dr. Prashant Vighe** (Paratwada-Amrawati)

**♦ Hon'ble Guest Editors ♦**

**Dr. Sushama Yadav** (New Delhi)
**Dr. Subhash Chandrakar** (Raipur)
**Dr. Anita Deshpande** (Bhopal)
**Dr. Sunilkumar Goyal** (Khandwa)
**Dr. J. Prabhash** (Kerala)
**Dr. B. Chandrashekhar** (Hydrabad)
**Dr. Sanjeevkumar Sharma** (Meerut)
**Dr. Shilpi Bose** (Raipur)
**Dr. Garima Jawualkar** (Bhopal)
**Dr. Ketan Govekar** (Panji-Goa)
**Dr. Shaikh Abul Barkat** (Hydrabad)

**♦ Editing Assists ♦**

**Dr. Sambhaji Patil** (Shindkheda)
**Asst. Prof. Gautam Bhalerao** (Jalgaon)
**Asst. Prof. Sanjay Patil** (Chopada)
**Asst. Prof. Ganesh Chavhan** (Muktainagar)
**Asst. Prof. Viqar Shaikh** (Jalgaon)
**Asst. Prof. Jawed Tadavi** (Jalgaon)

**♦ Managing Editor ♦**

Mr. Yuvraj Mali

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**

Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985

**Visit Us : www.mpspa.com E-mail : vicharmanthanjournal@gmail.com**

Scanned with CamScanner

# ✲ अनुक्रमणिका ✲


संपादकीय ........ ३
- प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

- संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि आजचा महाराष्ट्र ........ ७
  - डॉ. विनय. प. राऊत, मुंबई
- संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि आजचा महाराष्ट्र ........ १०
  - प्रा. सुनिल छगनराव पाटील, पारोळा, जि. जळगांव
  - प्रा. दिलीप हरसिंग राठोड, पारोळा, जि. जळगांव
- महाराष्ट्र निर्मिती : विदर्भाचे प्रश्न ........ १२
  - प्रा. डॉ. अनिल रा. कडू, वरुड, जि. अमरावती
- महाराष्ट्र निर्मिती : विदर्भाचे प्रश्न व उपाय ........ १६
  - प्रा. डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ, चाळीसगाव, जि. जळगाव
- महाराष्ट्र आणि प्रादेशिक असंतुलन ........ २०
  - प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे, धुळे, जि. धुळे
- महाराष्ट्र आणि प्रादेशिक असंतुलन ........ २४
  - प्रा. डॉ. प्रशांत विघे, परतवाडा, जि. अमरावती
- ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायतराज व्यवस्थेमधील राजकीय स्थित्यंतराचे चिकित्सक अध्ययन ........ २८
  - गणेश शेषराव तावरे, अकोला
  - डॉ. जीवन एच. पवार, अकोला
- महाराष्ट्रातील ग्रामीण भागात झालेले स्थित्यंतर ........ ३५
  - प्रा. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे, निजामपूर-जैताणे
- शेतकरी आत्महत्या आणि महाराष्ट्रातील कृषी व्यवस्था ........ ३८
  - प्रा संजय अ. मराठे, नांदगाव
- ✓ शेतकरी आत्महत्या व महाराष्ट्रातील कृषीव्यवस्था ........ ४२
  - प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे, शेंदुर्णी
- महाराष्ट्राची कृषीव्यवस्था आणि शेतकरी आत्महत्या ........ ४५
  - डॉ. शुभांगी एस. माने, म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली
  - प्रा. चैतन्य एस. कांबळे, म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली
- वैद्यकीय व्यवस्था आणि कंत्राटी कर्मचारी ........ ४८
  - प्रा. डॉ. विनोद गायकवाड, शेगांव
- महाराष्ट्रातील शैक्षणिक भुमिका ........ ५१
  - प्रा. डॉ. हेमलता भावसार, नांदुरा, जि. बुलडाणा
- लोकशाहीतील राजकीय नेतृत्वाची भूमिका ........ ५४
  - डॉ. जयश्री बोराटणे (मोरे)
- महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्त्वाची स्थित्यंतरे ........ ६२
  - प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर, अमरावती
- कामगार चळवळीतील अध्वर्यू : कॉ. श्रीपाद डांगे ........ ६५
  - प्रा. संजय पाटील, चोपडा, जि. जळगाव
  - डॉ. पी. यू. नेरपगार, साक्री




Scanned with CamScanner

# शेतकरी आत्महत्या व महाराष्ट्रातील कृषीव्यवस्था

– प्रा. डॉ. संजय वामनराव भोंडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आप्पासाहेब र.भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी

## प्रस्तावना

कृषी व्यवसाय करणारा आणि ७० टक्के कृषीप्रधान व्यवस्थेवर वाटचाल करणारा भारत देश हा जागतिक पातळीवर एकेकाळी सोने की चिडिया म्हणून ओळखला जात असे. परंतु कालांतराने आज याच भारतामध्ये आणि प्रमुख्याने महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांची अवस्था केविलवाणी होऊन शेतकरी हा जगाचा पोशिंदा मानला जाणारा महत्त्वाचा घटक आत्महत्येच्या वाटेने जात असताना आपणास दिसत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत भारतीय कृषी संस्कृतीत श्रम करून जगणाऱ्या वर्गाची संख्या अधिक आहे.परंतु मागील दोन दशकापासून भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील शेतकरी जलसिंचनाच्या प्रश्नामुळे व शासनाच्या शोषित धोरणामुळे संकटात सापडला आहे. त्यातच कोरड्या दुष्काळामुळे संकटात सापडलेला शेतकरी आपल्याला स्वत:ला संपवुन घेत आहे.

आज शेतकर्यांच्या वाढत्या आत्महत्या व कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हास हा दिवसेंदिवस वाढत असतांना त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्याचे निराकरण करणे ही भारताच्या विकासाच्या दृष्टीने काळाची गरज झाली आहे.

आज शेती करायला सर्वसामान्य शेतकरी वर्ग तयार होत नाही.कारण आजच्या शेतकरी वर्गाला शेतीसाठी अनेक संकटांना सामोरे जावे लागते जलसिंचन,सावकारी धोरणे,डबघाईला येणारा बाजार भाव अशा प्रश्नांमुळे शेतकरी आपल्यावर झालेले कर्ज सुद्धा फेडू शकत नाही. मग त्याच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा व विकासाचा प्रश्न वेगळाच असतो. आधुनिक युगात सावकारी पाश्यात सापडलेले शेतकरी आपल्या गळ्याला दोरीचा फास लावून स्वत:ला संपवतो अशा परिस्थितीचा विचार योग्य पातळीवर झाला नाही तर महाराष्ट्रातील कृषी व्यवसाय नष्ट होऊन महाराष्ट्राची परिस्थिती ही भयानक होईल. आज महाराष्ट्रात विदर्भातील अकोला,बुलढाणा,वाशीम,यवतमाळ, अमरावती,वर्धा हे ६ जिल्हे शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखले जातात.अश्या प्रकारची भयावह परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्र मधेच आज पाहायला मिळत आहे ,याचाही विचार कल्याणकारी राज्यामध्ये जाणीवपूर्वक होणे गरजेचे आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे

१) महाराष्ट्राच्या कृषी व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेणे
२) शेतकरी आत्महत्या व कृषी व्यवस्थे समोरील निर्माण होणारे प्रश्न याचा शोध घेणे
३) शेतकरी आत्महत्या होण्यामागील वास्तव परिस्थिती लक्षात घेणे
४) शासकीय पातळीवरील शेतकऱ्यांच्या योजना व त्यांचा शेती व शेतकऱ्यांना वास्तविक लाभ किती होतो याचा आढावा घेणे
५) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासकीय पातळीवर उपाययोजना सुचविणे
६) भारतातील एकूण शेतकरी आत्महत्या पेक्षा महाराष्ट्रात होणाऱ्या अधिक शेतकरी आत्महत्येचे कारण शोधणे.

वरील उद्दिष्टे समोर ठेवून प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये त्याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे

## शेतकरी आत्महत्येची कारणे

१) **नैसर्गिक कारणे :-** भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतकरी हा इंग्रजांच्या शोषणाखाली होता.आणि स्वातंत्र्यानंतर हाच शेतकरी निसर्गाच्या अवकृपेमुळे सावकाराच्या शोषणाखाली दडपला गेला आज जागतिक तापमान वाढीमुळेव निसर्गाच्या असमतोल पणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला आणि त्याचा परिणाम पावसावर होऊन अत्यंत अल्प प्रमाणात पाऊस पडत आहे.सन २०१८ या वर्षांमध्ये महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यामध्ये भिषण अशी दुष्काळाची परिस्थिती शासनाने घोषित केली आहे. त्याचा परिणाम आज महाराष्ट्रातील व्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन शेतकरी हवालदिल झाला आहे .आणि हा शेतकरी आपले प्रश्न सोडविण्यासाठी आत्महत्येच्या दिशेने पावले टाकत आहे.

२) **जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा :-** शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे भीषण संकट लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकार जलसिंचनाच्या दिशेने कोणतेही पाऊल टाकताना दिसत नाही. शेती करणाऱ्यांसाठी जलसिंचनाची आवश्यकता महत्वाची असते परंतू विविध उपक्रमांच्या माध्यमातून पाणी आडवून सिंचनसाठे करण्यात शासन व शेतकरी अपयशी झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्याला केवळ निसर्गाच्या पाण्यावर शेती करावी लागते व त्याचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांनी शेतीत पेरणीसाठी सावकाराकडून घेतलेले कर्ज सुध्दा शेतकरी फेडू शकत नाही त्यामुळे असा कर्जबाजारी झालेला शेतकरी आत्महत्या करत आहे मागील काही आकडेवारीनुसार असे दिसते की २००३ ते २०१४ या काळात जवळपास २५००आत्महत्या शेतकऱ्यांनी महाराष्ट्रातील एकट्या मराठवाड्यात केल्या आहेत हा अत्यंत गंभीर प्रश्न महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने आहे. याचा विचार शासकीय पातळीवर झालाच पाहिजे.



Scanned with CamScanner

३) **अयोग्य कृषी धोरणे :-** भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी जगला तर देश जगेल असे समीकरण भारताचे आहेत परंतु कृषिप्रधान भारतामधील शेतकऱ्यांसाठी कोणतेच ठोस व योग्य असे धोरण केंद्र किंवा महाराष्ट्र शासन आखतांना दिसत नाही.आश्वासने देऊन सरकार बदलतात व सत्तेवर येणारे सरकार पुन्हा पहिले पाढे पंचावन्न'या प्रमाणे चालतात. त्यामुळे रस्ते,वीज,पाणी दळणवळण योग्य बाजारभाव व बाजारपेठ या शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने डोळेझाक होते व ग्रामीण भागातील शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडतो व त्याला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरत नाही. ही कृषिप्रधान महाराष्ट्राच्या दृष्टीने सुद्धा अत्यंत वाईट बाब आहे.

४) **शेती क्षेत्राच्या दृष्टीने सरकारचे बदलते धोरण :-** भारतातील व महाराष्ट्रातील सर्व उद्योग धंदे शेतीच्या विकासावर अवलंबून आहेत परंतु सर्वच घटकांचा कणा असलेल्या शेती क्षेत्राला मात्र सबसिडीपासून वंचित राहावे लागते. जीएसटी सारख्या करामुळे शेतकरी पीळला जातो .अल्पशा कर्ज पुरवठ्यातून शेतकरी आपली गरज भागवू शकत नाही; शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य वेळी योग्य भाव दिला जात नाही पर्यायाने शेतकरी खचला जातो. अशा परिस्थितीतील शेतकऱ्यांनी जर आंदोलन केली तर त्यांच्यावर लाठीचार्ज करून शासन त्यांची आंदोलने दडपून टाकतात मग शेतकऱ्यांची बाजू घेण्यासाठी कुणीच पुढे येत नाही. असा सर्वच बाजूने खचलेला शेतकरी शेवटी एकच मार्ग स्विकारतो तो म्हणजे आत्महत्या.

५) **जागतिकीकरणाचा परिणाम :-** जागतिकीकरणामुळे जग झपाट्याने प्रगतीच्या दिशेने जात असले तरी बऱ्याच अशी त्याचा तोटा कृषी व्यवस्थेला सहन करावा लागत आहे कारण जागतिकीकरणामुळे देशाबाहेरील तंत्रज्ञान गावापर्यंत येऊन पोहोचले बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हिताची पीक पद्धती भारतात उदयाला आली व गावातील पिकांची पारंपरिक विविधता संपुष्टात आली आज बहुराष्ट्रीय कंपन्या शेतकऱ्यांसोबत करार करत आहेत करार शेतीमुळे शेतकरी परावलंबी होत चाललेला आहे. त्याच्या जमिनी व्यावसायिकरण उद्योगासाठी स्वस्त दराने घेतल्या जात आहेत. उद्योगपती व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात प्रक्रिया केंद्रीकरण झाल्यामुळे शेतकरी कच्च्या मालाचा केवळ उत्पादक बनला आहे. त्यामुळे स्वावलंबी शेतकरी परावलंबी झाला, व त्याचे प्रश्न वाढतच गेले आणि वाढत्या प्रश्नामुळे शेतकरी आत्महत्या देखील वाढत आहेत.

६) **भांडवली समस्या :-** जागतिक पातळीवरील इतर देशांच्या तुलनेत भारतातील व विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केवळ ३% एकूण कृषी उत्पादनाच्या अनुदान मिळते.

कृषी घटकांच्या विकासाकडे लक्ष देताना भांडवल या घटकांकडे देखील शासकीय पातळीवर लक्ष देणे गरजेचे असते परंतु महाराष्ट्रात आज अनेक शेतकरी शेती करण्यासाठी भांडवल नसल्यामुळे पंरपरागत पद्धतीने शेती करतात आणि त्यामुळे आवश्यक अशा शेतीसाठीच्या सुविधा शेतकरी निर्माण करू शकत नाहीत.महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांना इतरांच्या मदतीने शेती करावी लागते प्रसंगी साधनांची उपलब्धतेसाठी सावकाराकडून आजही महागड्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागते आणि घेतलेले कर्ज न फेडता आल्यामुळे आज महाराष्ट्रातील शेतकरी डबघाईला येऊन त्याचा परिणाम शेतकरी आत्महत्येमध्ये होतो.

७) **महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या कृषीविषयक विचाराकडे शासकीय पातळीवर दुर्लक्ष :-** शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देऊन महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज यांनी शेतकरी व शेती विकासाची धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी महाराष्ट्रात केली होती. त्यासाठी शेततळे, शेतीसाठी जोडधंदे व त्यासाठी आवश्यक कर्जपुरवठा असा विचार फुले ,शाहू विचारधारेमध्ये व कृतीमध्ये होता.कारण कृषीव्यवस्था सुधारली तर शेती व शेतकरी हा घटक सुधारेल व महाराष्ट्र हा संपन्न होईल असा पुरोगामी विचार यांचा होता. परंतु या विचारांची अंमलबजावणी आजच्या पुरोगामी महाराष्ट्रात होतांना फारशी दिसत नाही.

त्यामुळे महाराष्ट्राच्या कृषीव्यवस्थेत अनेक समस्या निर्माण होऊन त्याचा परिणाम कृषीव्यवस्था विकासाच्या वाटेने न जाता दिवसेदिवस अधोगतीच्या दिशेने जात आहे. यामुळे आजचा शेतकरी वर्ग आत्महत्येच्या दिशेने आपली वाटचाल करताना दिसत आहे.

**शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी आवश्यक उपाय योजना**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवून शेती व शेतकरी या दोन्ही महत्त्वाच्या घटकांना नवसंजीवनी मिळवून द्यायची असेल तर त्यासाठी सामाजिक,शासकीय व प्रशासनाच्या पातळीवर योग्य पावले उचलणे आवश्यक आहे.

१) जलसिंचनासाठी शेतकऱ्यांना योग्य व वेळेत मदत करणे
२) शेतीमालाला उत्पादनाच्या खर्चाच्या प्रमाणात योग्य हमीभाव मिळवून देणे आवश्यक आहे.
३) शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य व वेळेत बाजारपेठ उपलब्ध करून देणे
४) अल्प व्याजदरात अर्थपुरवठा करणे आवश्यक आहे
५) शेती विम्याची सुविधा सुलभ करणे
६) योग्य वेळी मुबलक विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणे
७) शेतीची अवजारे ,खते, बी-बियाणे यांच्यावर सबसिडी देणे व बोगस बियाणे, खते यांच्यावर नियंत्रण ठेवणे.
८) शासकीय योजनांची शासनाने योग्य अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना लाभ प्राप्त करून देणे
९) सहकाराचे पुनरुज्जीवन करणे

१०) जलयुक्त शिवार योजने बरोबर पाण्याचे व्यवस्थापन करणे

११) कृषी व्यापारासाठी डीजीटल प्लॅटफॉर्म मिळवून देणे

**निष्कर्ष**

एकंदरीतच प्रस्तुत लेखा द्वारे असे स्पष्ट करता येते की कृषिव्यवस्था जर सुधारली नाही तर संपूर्ण देशाचा कणा असणारा शेतकरी वर्ग भविष्यात शेती करू शकणार नाही. आणि शेतकऱ्यांनी शेतीचे उत्पादन नाही केले तर समाजाच्या एकूणच रचनेवर त्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी महाराष्ट्राच्या कृषीव्यवस्थेत योग्य त्या सुधारणा घडवून आणणे आणि या सुधारणांच्या माध्यमातून भारताला वैभव प्राप्त करून देणे हे शासनाचे व प्रशासनाचे जसे कार्य आहे तसेच कर्तव्य म्हणून समाज , शेतकरी वर्ग या घटकाने देखील सकारात्मक दृष्टिकोनातून शेती क्षेत्राकडे बघणे गरजेचे आहे.

**संदर्भ**


१. www.maharashtratimes.indiatimes.com
२. m.dailyhunt.in
३. www.esakal.com.maharashtra
४. www.loksatta.com
५. डॉ.अशोक चौसाळकर (संपादक)समाजप्रबोधन पत्रिका,अं., क्रमांक-२१८,एप्रिल-जुन २०१७
६. डॉ.पंडित नलावडे (संपादक )भारतापुढील आव्हाने सद्यस्थिती,कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद,पहिली आवृत्ती २०१५
७. डॉ.रेखा वानखेडे (मुख्यसंपादक)D-ES decision action gournal,vol.no.3/2011 issue no.3oct-dec-2011
८. डॉ.संभाजी काळे,शेकऱ्यांच्या आत्महत्या वास्तव व उपाय, पब्लिकेशन ,जळगाव



•••

Scanned with CamScanner

• महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका •

International Innovative Journal Impact Factor ((IIJIF)
2.283

UGC
Approved Journal
No.64299





अथर्व पब्लिकेशन्स्

Visit us... www.atharvapublications.com

ISSN 2347-9639
9 772347 963003


Scanned with CamScanner